# दैनिक अधिकारनामा

विदर्भातील सर्वाधिक पसंतीचे दैनिक

Email : adhikarnama2021@gmail.com    Web : www.adhikarnama.in

○ मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८० ○ कार्यालय : दै. अधिकारनामा, विवरा जि. अकोला – ४४४५११

अकोला * बुधवार दि. ३१ ऑगस्ट २०२२ * वर्ष २ रे * अंक ०८ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842





## फडणवीसांच्या दाव्याने शिंदे गटात घालमेल

**दै. अधिकारनामा**

**नाशिक :** भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांनी बारामती येथे भेट दिली असली तरी, भाजपाचे मिशन बारामतीच नव्हे तर महाराष्ट्र आहे, असे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गोटात गेलेल्या शिवसेनेच्या खासदारांची घालमेल वाढली आहे. भाजपाच जर लोकसभेच्या सर्व जागा लढवणार तर राजकीय भवितव्याचे काय असा प्रश्न खासदार हेमंत गोडसे यांच्या समर्थकांना पडला आहे. नाशिक येथे महानुभाव मेळाव्यासाठी आलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्याशी प्रसार माध्यमांनी संपर्क साधला असता, त्यांनी बाबा रामदेव यांच्याशी आपली झालेली भेट ही निव्वळ सदिच्छा भेट असल्याचे सांगितले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे हे बारामती दौऱ्यावर असल्यामुळे भाजपाचे मिशन बारामती सुरू आहे काय या प्रश्नावर बोलतांना फडणवीस यांनी भाजपाचे मिशन संपुर्ण महाराष्ट्र असल्याचे सांगून अधिक बोलण्यास नकार दिला. फडणवीस यांच्या विधानाचे अनेक अर्थ काढले जात असून, नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांनी बंडखोरी करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला समर्थन दिले आहे. हेमंत गोडसे यांनी बंडखोरी करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला समर्थन दिले आहे. साहजिकच हे समर्थन देतांना गोडसे यांनी आगामी लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आपल्या उमेदवारी ची तजवीज करून ठेवली आहे. मात्र, फडणवीस यांच्या म्हणण्यानुसार भाजपाचे महाराष्ट्र मिशन असेल तर नाशिकची जागा शिंदे गटाला गमवावी लागते की काय अशी चर्चा राजकीय वर्तुळात होऊ लागली आहे. फडणवीस यांच्या म्हणण्याचा अर्थ नाशिकची जागा भाजपाच लढवेल असा काढला जात असल्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत शिंदे गटाची नेमकी भूमिका काय असेल यावर चर्चा झडू लागली आहे.



## समुद्राची पातळी १ फुटाने वाढणार; शास्त्रज्ञांनी दिला इशारा

**दै. अधिकारनामा**

**नवी दिल्ली :** समुद्राच्या पाण्याची पातळी १ फुटाने वाढणार असल्याचा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे मोठ्या वेगाने ग्रीनलँडचा बर्फ वितळू लागला असल्याने समुद्राच्या पातळीवर त्याचा परिणाम होणार असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. ग्रीनलँडचा बर्फ वितळल्यामुळे समुद्राची पाणी पातळी कमीतकमी एका फुटाने तरी नक्कीच वाढणार आहे. आज, आता जरी जगातील उष्णतेचे उत्सर्जन रोखले तरी देखील तुमच्या हाती काहीच राहिलेले नाही, बर्फ वितळणारच, त्याला रोखू शकत नाही, असे नेचर क्लायमेटच्या एका रिपोर्टमध्ये म्हटले आहे.

डेन्मार्क आणि ग्रीनलँडच्या भूगर्भीय सर्वेक्षणाच्या संशोधकांना ग्रीनलँड आणि आसपासच्या बर्फाच्या आच्छादनामध्ये बदल दिसले आहेत. आधीचा वितळलेल्या बर्फामुळे त्याच्या खालच्या थराचा ग्रीनलँडचा सुमारे ३.३ टक्के बर्फ कोणत्याही परिस्थितीत वितळणार असल्याचे त्यांनी सांगितले. हा वितळलेला बर्फ सुमारे ११० ट्रिलियन टन इतका असेल. शास्त्रज्ञ जेसन बॉक्स यांच्या मतानुसार, कोणत्याही प्रकारच्या हवामानात बर्फ वितळेल आणि समुद्राची पातळी वाढेल. वितळण्याची ही प्रक्रिया किती काळ चालेल हे सांगता येणार नाही. परंतु शतकाच्या अखेरपर्यंत ती सुरू राहिल असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. उष्ण हवेमुळेच नाही तर समुद्राच्या पाण्याची उष्णता देखील वाढल्याने पाण्याखालील बर्फदेखील वितळू लागला आहे. यामुळे हिमकडे कोसळू लागले आहेत.

अमेरिकेच्या नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशनने या वर्षाच्या सुरुवातीला असाच एक अहवाल प्रसिद्ध केला होता. पुढील ३० वर्षांत अमेरिकेच्या किनाऱ्यारील पाणी १०-१२ इंचांनी वाढेल, असे या अहवालात म्हटले होते. भरतीच्या वेळी सर्वाधिक धोका असेल असेही यामध्ये म्हटले होते. यामुळे समुद्रकिनाऱ्यांवरील शहरे धोक्यात येतील असेही यात म्हटले होते.

## भाजप प्रदेशाध्यक्ष राज ठाकरेंच्या भेटीला

**दै. अधिकारनामा**

**मुंबई :** राज ठाकरे हे मोठ्या भावाप्रमाणे आहेत, भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांची भेट घेतली. राज ठाकरे आणि आमच्यात वैचारिक साम्य आहे. मात्र, युतीचा निणर्य फडणवीस नड्डा आणि शहा घेतील असेही यावेळी त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे आमच्या भेटीचे राजकीय अर्थ काढू नये असेही यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. पारिवारीक प्रेमामुळे उद्धव ठाकरे सर्व गोष्टी विसरले आहेत, बाळासाहेबांच्या विचारांना त्यांनी बगल देत आपले कर्तृत्व उद्धव ठाकरे करत आहेत, ते आता हिंदुत्ववादी राहिले नाही, असा घणाघात चंद्रशेखर बावनकुळे यांनी लगावला आहे. उद्धव ठाकरेंचे हिंदुत्व बोगडी आहे, तो कुटुंबीयांच्या प्रेमात सर्व काही विसरले आहेत, असा टोला भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे. यावेळी मनसेचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई आणि संदीप देशपांडे यांची उपस्थिती होती. शिवसेनेकडे आता इव्हेंट मॅनेजमेंट सुरू आहे, त्यांतून ते सर्व गोष्टी करत आहे. संघाचे कार्यकर्ते गेले असे मला वाटत नाही.




मात्र, संघाच्या कट्टर विरोधी विचारसरणीच्या असणाऱ्या संभाजी ब्रिगेडसोबत ते युती करतात. आणि स्वत:ला हिदुंत्ववादी म्हणातात का असा सवाल बावनकुळेंनी उपस्थित केला आहे. संध्या ते गडबडलेल्या भूमिकेत आहे, त्यांची भूमिका काहीच कळत नाही, शरद पवार आणि कॉंग्रेससोबत बसणाऱ्यांनी हिंदुत्वाच्या गप्पा मारू नये असा टोलाही त्यांनी लगावला आहे. त्यांच्यावर बोलून काहीच फायदा नाही असे म्हणतानाच बावनकुळें म्हणाले की, पुढच्या काळात मतदानाच्या वेळी जनता ठरवेल की खरे कुणोच आणि खोटे कुणाचे. राज्यातील वैचारिक साम्य असलेल्या नेत्यांशी मी पक्षाचा प्रदेश अध्यक्ष झाल्याने भेट घेत आहे, युतीचा संदर्भातील निणर्य केद्रातील नेतृत्व आणि देवेंद्र फडणवीस हे ठरवतील. मी केवळ संघटनात्मक बांधणीसाठी प्रयत्न करणार आहे असे सांगताना ते राज ठाकरे हिंदुत्वाचे रक्षण करणारे नेते आहेत म्हणून मी त्यांची भेट घेतली आहे. शरद पवारांनी अनेकदा महाराष्ट्र पिंजून काढला आहे, मात्र ते ६० च्यावर उमेदवार निवडून आणता आले नाही, ते फिरत असताना लोक त्यांना विचारतील की कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा असा टोला बावनकुळेंनी त्यांना लगावला आहे. मागील अडीच वर्षांतते फिरले का नाही असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. तर पवार जेव्हाही सत्तेत आले तेव्हा कुणाला ना कुणाला संपवूण आले असा टोला बावनकुळें नी पवारांना लगावला आहे.

---

दैनिक
**अधिकारनामा**
प्रस्तुत

# गणपती बाप्पा मोरया....



## * सेल्फी विथ बाप्पा – २०२२ *

आपल्या घरी पाहुणा म्हणून येणाऱ्या किंवा जवळच्या मंडपात विराजमान झालेल्या लाडक्या गणपती बाप्पाबरोबर तुम्ही सेल्फी घेतला नाही, असं होणं केवळ अशक्यच, नाही का? मग, हा तुमचा 'सेल्फी विथ बाप्पा' राज्यभरात पोहोचवण्यासाठी 'अधिकारनामा ऑनलाइन' सज्ज आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दैनिक अधिकारनामा च्या वेबसाइटवर गणेशोत्सवानिमित्त खास पान तयार करण्यात आलं आहे. त्यात, आजच्या सेल्फीयुगाचा विचार करून, तरुणाईचं सेल्फीप्रेम लक्षात घेऊन, बाप्पासोबतच्या सेल्फीसाठी खास सेक्शनच ठेवण्यात आलंय. आपल्या लाडक्या बाप्पा सोबत सेल्फी काढा आणि आमच्या कार्यालयाच्या व्हाट्सएप वर पाठवा. आम्ही आपल्या सेल्फी आमच्या लोकप्रिय वृत्तपत्रातून प्रसिद्धी देऊ.



### नियम आणि अटी..!

१) बाप्पा सोबत असलेली सेल्फी ही स्पष्ट असावी.
२) आपण एक जण किंवा आपल्या परिवारासोबत ची सेल्फी पाठवू शकता.
३) आमच्या व्हाट्सएप क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या काही निवडक च सेल्फी ना आम्ही आमच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी देऊ. (प्राप्त झालेल्या सेल्फी पैकी १०)
४) १० सेल्फी मधून एक सेल्फी ऑफ द डे ठरवल्या जाईल. आणि त्याला पहिल्या क्रमांकावर स्थान दिले जाईल.
५) सेल्फी पाठविण्याची वेळ ही सकाळी ७ वाजता पासून तर संध्याकाळी ७ पर्यंत च असेल.
६) सेल्फी पाठविण्यासाठी 9766382780 हा व्हाट्सएप क्रमांक आहे.

**तर मग वाट कसली बघताय, तयार व्हा 'सेल्फी विथ बाप्पा' साठी.**

## संपादकीय

# भ्रष्टाचाराचे इमले !

नवी दिल्लीचे उपनगर असल्याप्रमाणे विकसित झालेले आधुनिक शहर नोएडामध्ये सातशे कोटी रुपये खर्चून प्रत्येक मजल्यावर प्रशस्त चौदा फ्लॅट असणारी बत्तीस मजली इमारत पाडण्यात आली. या जुळया इमारती होत्या. त्या पाडण्यासाठी वापरलेल्या तंत्रज्ञानाची वाहवा करायची की, जगभर पसरणाऱ्या बातमीने व्याकूळ होऊन शरमेने मान खाली घालायची? नोएडासारख्या आधुनिक विकसित झालेल्या नागरीकरणात बत्तीस मजल्यांच्या दोन मोठ्या इमारती उभ्या राहतात आणि त्याविषयी तक्रारी होऊनही संपूर्ण सरकारी यंत्रणा काहीच कारवाई करत नाही! अखेरीस रहिवाशांना न्यायालयात जावे लागते. न्यायालयाच्या आदेशाने दोन्ही इमारती पाडून टाकण्यात येतात. आजच्या बाजारपेठेच्या भावाप्रमाणे या इमारतींची किंमत काही हजार कोटी रुपयांमध्ये होईल. न्यायालयाने आदेश दिला नसता तर संपूर्ण सरकारी यंत्रणा विकत घेऊन भ्रष्टाचाराचे इमले चढविलेल्या या इमारती कायम राहिल्या असत्या. या इमारती पाडण्यासाठी केवळ बारा सेकंद लागले. त्यासाठी अभियांत्रिकी ज्ञानाचा वापर करण्यात आला, पण याचे कौतुक तरी कसे करायचे. देशाच्या राजधानीच्या वेशीवरील




नोएडा या शहरात अनेक वर्षे हे बांधकाम चालू असताना कोणाला रोखता आले नाही. सर्वोच्च न्यायालयाने अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आधारेच हे बांधकाम बेकायदा ठरवून पाडून टाकण्याचा आदेश दिला. अलीकडेच भारतीय विद्यापीठ आयोगाने देशभरात चाळीस विद्यापीठे बेकायदा चालविण्यात येत असल्याचे सांगत त्या विद्यापीठांची यादीच जाहीर केली होती. पैसा आणि सत्तेला कसेही वाकविता येते, अशी घमेंड असणाऱ्या वर्गाला बेकायदा विद्यापीठ चालविण्यात गैर वाटत नाही. हे फार भयानक आहे. मुंबईजवळच्या कल्याण शहरात ४० हजार घरांची आणि पुण्याजवळ पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत १ लाख ४० हजार घरांची बेकायदा बांधकामे करण्यात आली होती. इतक्या मोठ्या प्रमाणात नवी घरे एखाद्या शहरात उभी राहत असताना महापालिका प्रशासनास थांगपत्ता लागू नये, याचे आश्चर्य वाटते. किंबहुना माहीत असूनही कारवाई करण्यात येत नाही. याचे एकमेव कारण भ्रष्टाचाराने बरबटलेली शासकीय यंत्रणा !

कल्याण आणि पिंपरी-चिंचवड शहरातील ही हजारो घरे पाडण्याऐवजी ती कायम करण्यासाठी ज्या कायद्याखाली बेकायदा ठरत होती, तो कायदाच बदलण्यात आला. त्या घरांच्या मालकांना अभय देण्यात आले. संपूर्ण समाजाचे हातच भ्रष्टाचाराने बरबटून गेल्यावर काय करायचे, असा सवाल करीत आपल्या लोकप्रतिनिधींनी कायदाच बदलून टाकला. सगळी यंत्रणाच भ्रष्टाचाराने पोखरली गेली आहे. महाराष्ट्रात दरवर्षी बेकायदा शाळा, विनापरवानगी चालविलेली हायस्कूल किंवा महाविद्यालये यांची यादी जाहीर करण्यात येते. विद्यादानाचे कार्य करणाऱ्या संस्थाच योग्य ती रीतसर परवानगी न घेता चालविल्या जातात. त्यांच्यावर कारवाई होत नाही. बिहारमधील एका जिल्ह्यात पोलीस ठाणेच बनावट निघाले. त्या पोलीस ठाण्याला मंजुरी नाही. मात्र, काही टग्यांनी पोलिसांचा वेश धारण करून चक्क पोलीस ठाणेच चालविले होते. आपल्या लोकशाही शासन व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारे हे सर्व प्रकार आहेत. कोविडसारख्या मानवी जीवनाला हादरवून सोडणाऱ्या संसर्गजन्य रोगाचा प्रसार होताना त्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनेत भ्रष्टाचार करण्यात आल्याची प्रकरणे घडली. माणसांनी आपल्या सत्वाची पातळी सोडून शासकीय यंत्रणाच विकायला काढली, असे वाटू लागले. हिंदी चित्रपटात खलनायकांचे अनेक कारनामे दाखवितात. ते पाहताना माणूस इतक्या खालच्या स्तराला कसा जाईल, असे वाटते. हिंदी चित्रपटात बऱ्याचदा अतिशयोक्ती करण्यात येते, असे वाटते; पण नोएडा ते महाराष्ट्रातील अनेक प्रकरणे पाहिली तर असे वाटते की, आपले हिंदी चित्रपट खरेच वास्तव दाखवितात! नोएडामधील दोन्ही टॉवरच्या उभारणीसाठी ज्यांनी मदत केली, परवानग्या दिल्या, काम पूर्ण झाल्याचे दाखले दिले या साऱ्यांना पकडले पाहिजे. म्हातारी गेल्याचे दुःख नाही; पण काळ सोकावता कामा नये. यापुढे असे प्रकार घडणार नाहीत, याची दक्षता घेणारे कडक कायदे करायला हवेत. ते मोडणाऱ्यांना अटकाव करण्यासाठीही हे कायदे केले पाहिजेत. रोज तयार होणारे भ्रष्टाचाराचे हे इमलेच इमले पाडून टाकायचे असतील तर यात गुंतलेल्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे.

# नाटकवाल्यांकडे सरकारचे लक्ष आहे काय?

मराठी रंगभूमीच्या अडचणींची जाणीव सरकारला आहे आणि नाट्यगृहांच्या उपलब्धतेपासून अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सरकार नाट्यकर्मींच्या पाठीशी उभे राहील, असा दिलासा राज्याचे ताजे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हल्लीच दिला. मराठी माणसाचे पहिले प्रेम हे नाटकावर आहे, असे अभिमानाने सांगितले जायचे व आजही सांगितले जाते. मात्र, महाराष्ट्राच्या मराठी भाषाभूमीतच नाटकांची, कलाकारांची कुचंबणा होतेय, अशी खंत पुण्यातील अस्सल 'नाटकवाला' अतुल पेठे यांनी सोशल मीडियावर मांडली, त्याला फार दिवस झालेले नाहीत. ङ्गमाझ्या या पोस्टचा काहीही उपयोग होणार नाही हे माहीत असूनही लिहिण्यावाचून गत्यंतर नाही. यातून कदाचित काहींना आमची अवस्था कळेलङ्ग अशी संतप्त जोड द्यायलाही पेठे विसरले नव्हते. राज्यातल्या नाट्यगृहांची अवस्था भीषण असताना त्यांची भाडी मात्र अव्वाच्या सव्वा आहेत. अशी भाडी आकारणाऱ्या आणि कमालीची अनास्था असणाऱ्या नगरपालिका, महापालिकांचा आणि तिथल्या अधिकार असलेल्या बथ्थड लोकांचा धिक्कार पेठे यांनी केला. अतुल पेठे यांच्या या पोस्टवर अनेकांनी तितक्याच संतप्त प्रतिक्रिया लिहिल्या. पण त्याचे पुढे काही झाले नाही. ते होणार नाही, हे मला माहिती आहे, ही भविष्यवाणी स्वतः पेठेंनी आधीच केली होती. बहुतांश रंगकर्मींची अशी भावना आहे की, प्रशासनातील सनदी अधिकाऱ्यांच्या प्राधान्यक्रमावर सांस्कृतिक क्षेत्र नाही. त्यातल्या त्यात मराठी नाटक तर नाहीच नाही. नाटक हा विषय औषधापुरताही माहीत नसलेले अधिकारी केवळ राज्यकर्त्यांच्या दबावापोटी त्यांना हवे तसे नाट्यगृह बांधून मोकळे होतात. मीरा-भाईंदरमधील नाट्यगृह हे तिसऱ्या मजल्यावर, तर पनवेलमधील नाट्यगृह दुसऱ्या मजल्यावर बांधले आहे. अशा ठिकाणी नाटकाचा सेट वर कसा चढवायचा?- या मूलभूत प्रश्नाचा विचार ती नाट्यगृहे बांधून होईपर्यंत कुणी म्हणता कुणी केला नाही. अशा नाट्यगृहात प्रयोग करताना बॅकस्टेज कामगारांना जास्त नाईट द्यावी लागल्याने संस्थांच्या आर्थिक गणिताचे बारा वाजतात. नाटकवाल्यांची गरज काय आहे, हे न पाहता नाट्यगृहे बांधली गेली, की त्रुटी जाणवू लागतात; मग



दुरुस्तीच्या नावाखाली पुन्हा भरमसाठ खर्च केला जातो. असे सुमारे ७० ते ८० कोटी रुपये खर्च झाल्यानंतर मग या नाट्यगृहांकडे कमाईचे साधन म्हणून पाहिले जाते. बगीचे, उद्याने विकसित करण्यावरही महापालिका, नगरपालिका, शासन खर्च करते. मात्र, तेथे प्रवेश विनामूल्य असतो किंवा नाममात्र शुल्क आकारले जाते. नाट्यगृहांना मात्रा हा न्याय नाही. मुंबईत एखाद्या व्यावसायिक नाटकाचा प्रयोग करायचा तर किमान लाखभर रुपयांचा खर्च येतो. पुण्यात हा आकडा वाढतोच. एखादा बडा स्टार कलाकार नाटकात असेल तर नाटक हाऊसफुल्ल होऊन निर्मात्याला २० ते २५ हजार रुपयांचा लाभ होतो. मात्र, छोटे कलाकार व नवखे निर्माते यांना नाट्यगृहांचे भाडे, नाटकाच्या जाहिराती, प्रवास व निवासाचा खर्च हे सारे परवडत नाही.

नवी मुंबईतील नाट्यगृहाचा अपवाद वगळला तर बहुतांश नाट्यगृहांमध्ये सुविधांचा अभाव आहे. नवी मुंबईतील नाट्यगृहाची देखभाल करण्याची जबाबदारी बाहेरील संस्थेला दिलेली आहे. ख्यातनाम अभिनेते व निर्माते प्रशांत दामले यांच्या मते महाराष्ट्रात सरकारी मालकीच्या ५२ नाट्यगृहांमध्ये नाटकांचे प्रयोग होतात. त्या नाट्यगृहांचा दर्जा सुधारावा याकरिता ५०० कोटींचा निधी सरकारने उपलब्ध करुन दिला तर त्यावरील व्याजातून नाट्यगृहांची देखभाल ठेवणे सोपे होईल. राज्यातील ९२हून अधिक नाट्यगृहे ही सरकारच्या वेगवेगळया खात्यांच्या अखत्यारित येतात. त्यामुळे नगरविकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियम, अटी यामध्ये तफावत असते. मुंबई महापालिकेच्या बोरिवली व विलेपार्ले येथील नाट्यगृहांकरिता स्वतंत्र नियम आहेत. सरकारी नाट्यगृहे बकाल आणि खासगी सिनेमागृहे चकचकीत; त्यामुळे आधीच दुर्मीळ असलेला नाटकांचा प्रेक्षक नाके मुरडणार! अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने २८ ऑक्टोबर २०२० रोजी परिषदेचे तहहयात विश्वस्त शरद पवार यांना एक व्हीजन डॉक्युमेंट दिले होते. त्यामध्ये ६०पेक्षा जास्त नाट्यगृहांच्या दुरुस्ती, देखभालीकरिता प्रत्येकी २० कोटी याप्रमाणे १,२०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. नाट्यगृह चालवण्याचा वार्षिक खर्च किमान दोन कोटी आहे. याकरिता मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करावी, अशी विनंती नाट्य परिषदेने केली होती. या समितीत नाट्यलेखक, दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञ, निर्माते यांच्यासह नाट्य परिषदेच्या प्रतिनिधींचा समावेश असावा, महाराष्ट्रात कुठेही नाट्यगृहाची उभारणी - दुरुस्ती करण्यापूर्वी या समितीची संमती अनिवार्य असावी, नाट्यगृहांकरिता दुरुस्ती व देखभाल निधीची उभारणी करावी, नाट्यगृहांच्या हाऊसकिपिंगचे कंत्राट राज्यभराकरिता एकाच कंपनीला द्यावे, नाट्यगृहांचा मालमत्ता कर माफ करावा या व अशा मागण्यांचा त्या डॉक्युमेंटमध्ये समावेश असल्याचे नाट्य निर्माते व परिषदेचे अध्यक्ष प्रसाद कांबळी सांगतात.

# युगधर्म आणि सर्वोदय

समाजवादाशी बांधिलकी असणाऱ्या अनेक व्यक्ती विनोबांशी जवळीक राखणाऱ्या होत्या. काही जणांचा प्रवास काँग्रेस आणि नंतर समाजवाद असा झाला तर काही जण सुरुवातीपासूनच समाजवादी होते. विनोबांवर प्रखर टीका करणारेही याच विचारसरणीशी बांधिलकी मानणारे होते. विनोबांना नेता मानणाऱ्या गटात साने गुरुजींचे नाव अटळपणे येते. साने गुरुजींनी आयुष्य संपवले त्यावर विनोबांच्या काही प्रतिक्रिया यासाठी पुरेशा बोलक्या आहेत. साने गुरुजींकडे मातेची उत्कटता होती, मात्र योग्याची समत्वबुद्धी नव्हती. तुकोबांच्या नंतरचा संत म्हणून साने गुरुजींचे नाव घ्यावे लागेल, असेही विनोबा म्हणत. साने गुरुजींना जवळ ठेवून घेतले असते तर बरे झाले असते याचीही विनोबांना खंत असावी. अर्थात गीता प्रवचनांचे शब्दांकन गुरुजींनी केले आणि 'सच्चिदानंदबाबा' हे विशेषण विनोबांकडून मिळवले. पुढे भूदान आंदोलनाच्या काळात विनोबांना कार्यकर्त्यांची फौज मिळाली त्यात जयप्रकाश नारायण अग्रणी होते. आणीबाणी व जयप्रकाश नारायण यांची संपूर्ण सामाजिक क्रांती यामुळे समाजवादी परिवारातील विनोबांच्या टीकाकारांची संख्या वाढली. विनोबांनी केला तो गांधी-विचारांचा विकास केला की ऱ्हास असा सवाल करत विनोबांनी ऱ्हास केला असा निणऱ्य देणारे पुन्हा याच गटातील अभ्यासक होते. त्याच सुमारास, गांधीजींचे आध्यात्मिक वारसदार विनोबा तर राजकीय वारसदार नेहरू अशीही मांडणी समोर येत होती. या पार्श्वभूमीवर सामाजिक परिवर्तन आणि आध्यात्मिक उन्नती, गांधी आणि विनोबांचे राजकीय नाते, विनोबांच्या स्थितप्रज्ञतेची भारतीय परिवर्तनासाठी असणारी अत्यावश्यकता अशा नानाविध मुद्दय़ांना कवेत घेत विनोबांच्या कार्याची महती आचार्य जावडेकर यांनी दिली. गांधीजींचे राजकीय वारसदार म्हणून विनोबांचेच नाव घ्यावे लागेल हा नेमका निष्कर्ष हे जावडेकरांचे विशेष म्हणावे लागेल. या दृष्टीने जावडेकरांचे पुढील विश्लेषण महत्त्वाचे आहे.

'नवसमाजवादी समाजरचना' अथवा 'सर्वोदयवाद' ही केवळ राजकीय ध्येये नाहीत. सर्वागीण समाजरचनेची आणि अंतर्बाह्य जीवननिष्ठेची ती ध्येये आहेत. आजची समाजरचना विघातक झाली आहे. या समाजरचनेत आमूलाग्र क्रांती घडवून आणल्यावाचून समाजधारणा होणार नाही. या स्फोटक परिस्थितीची जाणीव केवळ आदर्शनिष्ठ साधुसंतांना किंवा वेदान्त्यांबरोबरच वास्तववादी व व्यवहारदक्ष मुत्सद्दय़ांनाही झाली आहे. यामुळे सामाजिक क्रांती व आर्थिक क्रांती हा युगधर्म झाला आहे. या क्रांतीचे स्वरूप समाजवादी रचना स्थापन करणे या स्वरूपाचे असले तरी ते मानवाची धर्मभावना व मोक्षवृत्ती यांना अनुरूप असेच आहे व त्यांना अनुरूप अशा साधनांनीच ते खऱ्या अर्थाने घडू शकेल. आचार्य जावडेकर यांची ही भूमिका विनोबांच्या साम्ययोगाची आठवण करून देणारी आहे. दोघेही अहसक क्रांतीचे पुरस्कर्ते होते. अध्ययनशील आणि गतिमान होते. युगधर्म काय आहे याचे उभयतांना भान होते. आज गांधीजी, विनोबा, साने गुरुजी, आचार्य जावडेकर, जयप्रकाश नारायण या व्यक्ती विचाररूपानेच शिल्लक आहेत. प्रत्येकाच्या विचारविश्वाची खासियत आहे. ते विचारविश्व या युगाचा धर्म शोधायला नक्की उपकारक ठरेल.

# दुष्काळ चीनमध्ये; पण चटके अख्ख्या जगाला !

जागतिक तापमानवाढीच्या विळख्यात चीन सापडला असून, कडाक्याची उष्णता आणि कमी पाऊस यामुळे तेथे दुष्काळाचे इशारे सातत्याने दिले जात आहेत. जागतिक स्तरावर अत्यंत आक्रमक असलेल्या चीनला आता दुष्काळामुळे संकटाला तोंड द्यावे लागते आहे. जगाचा पुरवठादार असलेल्या चीनमधील दुष्काळामुळे जगातील अन्य देश महागाईत ढकलले जाण्याची शक्यता आहे. चीनवर जगातील बहुतांश देश या ना-त्या कारणाने अवलंबून आहेत. गहू आणि तांदूळ उत्पादनात चीन हा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश आहे. त्याचबरोबर मका उत्पादनात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. चीनमधील उत्पादन कमी झाले, तर अनेक लहान आणि गरीब देशांवरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. अमेरिकेच्या कृषी विभागाने २०२० - २१ साठीचा चीनच्या भुईमूग उत्पादनाचा अंदाज १७.७ दशलक्ष मेट्रिक टन वर्तविला आहे. मात्र, दुष्काळामुळे पेरणी व काढणीवर विपरीत परिणाम होणार आहे. त्याचे परिणाम भारतालाही भोगावे लागतील. इथली महागाई अधिक वाढण्याची शक्यता आहे. येत्या हंगामात गुजरात आणि भारतात खाद्यतेल आणि विशेषतः शेंगदाणा तेलाच्या किमती वाढतील. चीनमध्ये ६१ वर्षांतील सर्वात भीषण उष्मा आणि दुष्काळामुळे विजेचे संकट निर्माण झाले आहे. अनेक शहरे अंधारात बुडाली आहेत. उष्णतेसोबतच पावसाअभावी चीनच्या अडचणीत भर पडली आहे. जुलैमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ४० टक्के कमी पाऊस पडला आहे. चीनच्या सिचुआन, हुबेई, हुनान, जिआंग्शी, अनहुई आणि चोंगकिंग प्रांतातील २.४६ दशलक्ष लोक आणि २.२ दशलक्ष हेक्टर शेतजमीन दुष्काळाने प्रभावित झाली आहे. दुष्काळामुळे ७.८० लाखांहून अधिक लोकांना सरकारकडून थेट मदतीची गरज



आहे. यांगत्झी नदी चीनमधील ४०० दशलक्ष लोकांना पिण्याचे पाणी पुरवते. परंतु तिच्या पाण्याचा प्रवाह गेल्या पाच वर्षांच्या सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. दुष्काळ आणि उष्णतेमुळे चीनच्या मध्यवर्ती आणि यांगत्से नदीच्या खोऱ्यातील भात आणि मक्याचे उत्पादन प्रभावित होईल. पोयांग हे सरोवर चीनमधील सर्वात मोठे गोड्या पाण्याचे सरोवर आहे. त्यात अवघे २५ टक्के पाणी आहे. स्थानिक भागात पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची समस्या निर्माण झाली आहे. भाज्यांच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत.

चीनमधील वीज संकटामुळे अनेक मोठे कारखाने बंद झाले आहेत. चीन आपल्या गरजेच्या १५ टक्के वीज पाण्यापासून - म्हणजेच जलविद्युत - निर्माण करतो. कमी पावसामुळे त्याच्या जलविद्युत क्षमतेवरही विपरीत परिणाम झाला आहे. ८४ दशलक्ष लोकसंख्या असलेल्या सिचुआन प्रांताने २०२१मध्ये ८० टक्के विजेची गरज जलविद्युतमधून भागविली होती. यावर्षी ऑगस्टमध्ये, सिचुआन प्रांतात जलविद्युतसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची उपलब्धता ५० टक्के कमी झाली आहे, तर कडक उन्हाळयामुळे विजेची मागणी २५ टक्के वाढली आहे. वाढत्या उष्णतेमुळे चीनमध्ये एसीच्या मागणीत मोठी वाढ झाली असून, त्यामुळे पॉवर ग्रीडवर अतिरिक्त भार टाकला जात आहे. फोक्सवॅगन आणि ॲपलसारख्या कंपन्यांनी काम बंद केले आहे. चीनमधील अनेक शहरांतील कारखान्यांना आठवडाभर काम थांबवण्याचे किंवा उत्पादन कमी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जर्मन कार कंपनी फोक्सवॅगनने म्हटले आहे की, सिचुआनची राजधानी चेंगडू येथील कारखाना वीज खंडित झाल्यामुळे बंद आहे. ॲपलचा पुरवठादार फॉक्सकॉनने सिचुआनमधील आपला प्लांटही सध्या बंद केला आहे. टोयोटाच्या प्लांटमधील कामही बंद आहे. सिचुआन आणि चोंगकिंगमध्ये, इलेक्ट्रिक वाहनांच्या मालकांनी रिचार्जिंग स्टेशन बंद झाल्याबद्दल तक्रार केली आहे. यामुळे चीनवर अवलंबून असलेल्या देशांनाही मोठी किंमत मोजावी लागते आहे. भारत हा मोठा आयातदार देश आहे. चीनमधील दुष्काळाचा अन्य देशांसह भारतावरही परिणाम संभवतो.

# दत्ता ऊर्फ अप्पा गांधी

वयाची शंभरी गाठलेले विलेपार्ल्याचे दत्ता गांधी आजही खणखणीतपणे सांगतात नव्या पिढीला प्रेरक असा १९४२च्या भारत छोडो आंदोलनातील मंतरलेल्या दिवसांचा इतिहास! स्वातंत्र्य लढ्याच्या त्या धगधगत्या पर्वाच्या आठवणीत शिरलेल्या अप्पांना अजूनही लख्खपणे आठवते ती ९ ऑगस्ट १९४२ ची तुफान पावसाची रात्र !... पुराने बेफाम वाहणाऱ्या सावित्रीच्या काठावरील महाडची निद्रिस्त बाजारपेठ! मामांच्या घरी झोपलेल्या दत्तूला त्याच्या राष्ट्रसेवा दलातील मित्राची कमलाकर दांडेकरची हाक ऐकू आली. त्याने अप्पांना घराबाहेर काढले. आठ तारखेला गांधीजींनी ब्रिटिशांना निर्वाणीचा इशारा दिला होता, भारत छोडो! त्यांच्या 'करेंगे या मरेंगे!' या शब्दांनी लाखो तरुणांच्या मनात स्वातंत्र्याचे स्फुलिंग चेतवले होते. त्यापैकीच एक होते पोलादपूरला १५ मे १९२३ ला जन्मलेले अप्पा ऊर्फ दत्तात्रेय गोपीनाथ गांधी. महाडमध्ये मामांकडे शिकायला राहिलेल्या अप्पांनी कमलाकर व अन्य दोस्तांच्या मदतीने शाळा सकाळीच बंद पाडली होती. देशभर मोठ्या नेत्यांची धरपकड झाली होती. इकडे महाडमध्ये नाना पुरोहितांच्या गोटात काही कट शिजत होता. पोलीस फाटा वाढेल, हे समजताच रणनीती आखण्याच्या विचारात अप्पा होते; पण कमलाकरचे रक्त उसळत होते. 'आपण पल्याडच्या काठावरील ब्रिटिश ट्रेजरीवर तिरंगा लावायचा,' - कमलाकर म्हणाला, पण पोलिसांचा कडक पहारा होता. दोघांच्या अंगात रग आणि मनात स्वातंत्र्याची धग होती. त्यातूनच त्यांनी पुरात उड्या घेतल्या! दुथडी भरून वाहणाऱ्या सावित्रीच्या प्रवाहात उलट दिशेने पोहत पाच मिनिटांच्या अंतरावरील पैलतीर गाठायला पाऊण तास लागला. पोलिसांची नजर चुकवून मोठ्या शिताफीने त्यांनी ट्रेझरीची पिछाडी गाठली. कमलाकरने चपळाईने वर चढत कौलांच्या बेचक्यात मध्यरात्री तिरंगा रोवला.

'वंदे मातरम्'चा नारा पावसात विरतो तोच दोघांनी सावित्रीच्या पाण्यात परत सूर मारला. वेगाने अंतर कापत दोघे ऐलतीरावरील जाखमातेच्या मंदिरात पोहोचले. कमलाकरने चटदिशी खिशातून चाकू काढला आणि करंगळीवर मारला. रक्ताची चिळकांडी उडाली. त्याच रक्ताने दोघांनी कागदावर प्रतिज्ञा लिहिली, 'देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही.' त्याच रात्री अप्पांनी मामींना चिठ्ठी लिहिली आणि माणगावजवळील खरवली गाव गाठलं. मोठे बंधू शंकर भाईंच्या भूमिगत गटात ते सामील झाले. अप्पांचे वडील पोलादपुरातील काँग्रेसचे नेते आणि मोठे बंधू शंकरभाई मिठाचा सत्याग्रह करून दंडाबेडीचा कारावास भोगून आले होते. महाडमध्ये एका सभेत डॉ. आंबेडकरांनी 'खूप वाच म्हणजे दलितांचे प्रश्न तुला कळतील,' असे सांगितले होते. १० सप्टेंबरला महाडला नानासाहेब पुरोहित मोर्चा काढणार होते, तिथे पोलिसांची कुमक पोहोचणार नाही, यासाठी पेण व माणगावपुढील महाडचा रस्ता अडवायचा होता. त्यांनी झाडे, तारायंत्राच्या तारा तोडल्या. घोड नदीचा पूल तोडण्यासाठी रस्त्याचे चिरे उखडताना नेमका विंचू हाताला डसला; पण भाईंच्या साथीदाराने दंश झालेल्या जागेच्या बरोबर वरती कोयत्याचा वार करून रक्त वाहू दिले. करकचून दोरखंड बांधला. अंगात ताप भरला होता. अप्पा तिथेच ग्लानी येऊन पडले. मोर्चा फसला. दुसऱ्या दिवशी महाडला चौकशी केली, तर कळले की, मांढरे फौजदाराने केलेल्या गोळीबारात अप्पांचे प्रिय मित्र कमलाकर दांडेकर शहीद झाले. विसापूरचा तुरुंगवास खडतर होता. ब्रिटिश जेलर क्रूर. अन्नात अळी, भाजीत गवत नाहीतर पाला ही नित्याची बाब. भूक हडताल होत असत. त्यावर वाट्याला येई लाठीचार्ज; पण तुरुंगात बौद्धिके होत. अप्पा तब्बल १९४ पुस्तके वाचू शकले.

थोडक्यात

## पंढरपूर, तुळजापूर देवस्थानांचा विकास आराखडा

दै. अधिकारनामा



**मुंबई :** राज्यातील रेल्वे, मेट्रो, मल्टिमॉडेल कॉरिडॉर तसेच तुळजापूर आणि पंढरपूर देवस्थान या प्रकल्पांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (२९ ऑगस्ट) आढावा घेतला. दोन्ही देवस्थानांचा रेंगाळलेला विकास आराखडा दोन महिन्यांत नव्याने सादर करा आणि आणि मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या भूसंपादनास गती द्यावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. याशिवाय राज्यातील पायाभूत सुविधांचे प्रकल्प कालबद्धरीत्या पूर्ण करा, असे आदेशही मुख्यमंत्री शिंदेंनी दिले आहेत. याशिवाय तुळजापूरसाठी ३१५ कोटींच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला २००८ मध्ये मान्यता देण्यात आली.त्यामुळे तीर्थक्षेत्र विकासांना चालना मिळणार आहे.

नाशिक-पुणे मार्गाला नीती आयोगाने एप्रिल २०२२ मध्ये मान्यता दिली असून केंद्राच्या अर्थविषयक व्यवहार मंत्रिमंडळ समितीची मान्यता बाकी आहे. यासाठीदेखील खासगी जागेचे भूसंपादन, शासकीय व वनजमिनीचे हस्तांरण या बाबींना गती देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

## १६ धरणे भरतील एवढ्या पाण्याचा हतनूरमधून विसर्ग

दै. अधिकारनामा



**जळगाव :** गतवर्षीच्या तुलनेत यंदा हतनूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला. त्यामुळे धरणातून आतापर्यंत तब्बल ६ हजार २७२ दलघमी पाण्याचा तापी नदीत विसर्ग करण्यात आला आहे. या पाण्यातून हतनूरसारखी १६ धरणे भरली असती. दरम्यान, या विसर्गानंतर सध्या धरणात ५२ टक्के साठा आहे. पुढील नियोजनानुसार धरण १० ऑक्टोबरपर्यंत १०० टक्के भरेल.हतनूर धरणातून गेल्या वर्षी सुमारे ५ हजार दलघमी पाण्याचा विसर्ग झाला होता. यंदा मात्र तो वाढून ६ हजार २७२ दलघमीवर पोहोचला आहे.

प्रशासनाने १५ सप्टेंबरला होणारी ७२ टक्के जलसाठ्याची पातळी गाठण्यासाठी नियोजन केले आहे. धरणातून विसर्ग करून १५ सप्टेंबरपर्यंत ७२ टक्के साठा केला जाणार आहे. यंदा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला. गतवर्षाच्या तुलनेत किमान १२५० दलघमी विसर्ग झाला.

## नोकरीच्या आमिषाने अनेकांची फसवणूक

दै. अधिकारनामा

**जळगाव :** पाचोरा तालुक्यातील खाजोळा येथे राहणाऱ्या भुषण शरद पाटील याने तालुक्यातील अनेक तरुणांना सरकारी नोकरीस लावून देण्याचे आमीष देत लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे प्रकार समोर येत आहेत. गेल्या आठवड्यात एका तरुणाने गुन्हा दाखल केला होता. यानंतर मंगळवारी भुषणच्या विरुद्ध पुन्हा दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यात दोन तरुणांची तब्बल २८ लाख रुपयांत फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. यातील एक पानटपरी चालक असून त्याच्यासह अनेकांनी देखील नोकरीसाठी २४ लाख रुपये दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. कैलास अशोक पाटील (वय ४१, रा. तारखेडा, ता. पाचोरा) हे पानटपरीचालक आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ७ जानेवारी २०२० रोजी भुषण पाटील याने त्यांना संपर्क केला. रल्वेत गँगमन, टीसी, म्हाडा, फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्ये शिपाई पदावर नोकरी लावून देतो, असे आमीष भुषणने दिले. त्यापोटी पत्येकी १० लाख रुपये लागतील असे त्याने सांगीतले होते. भुषणच्या आमीषांना बळी पडल्याने कैलास पाटील यांच्यासहह काही जणांनी मिळुन भुषणला २४ लाख ३९ हजार ५०० रुपये दिले. अडीच वर्ष उलटल्यानंतर देखील भुषणने नोकरीच्या संदर्भात काहीच कार्यवाही केली नाही. लोकांनी नोकरीसाठी तगादा लावल्याने भुषण बेपत्ता झाला होता. दरम्यान, गेल्या आठवड्यात भुषणच्या विरुद्ध अशाच प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर फसवणूक झालेले अनेक जण समोर आले. त्यानुसार आता गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

पाचोरा तालुक्यातील चिंचखेडा येथे राहणाऱ्या छायाबाई दिलीप पाटील (वय ५२) यांच्याकडून देखील भुषणने चार हजार रुपये घेतले आहेत. छायाबाई यांचा मुलगा राहूलला नोकरी लावून देण्याचे आमीष त्याने दिले होते. १५ जानेवारी २०२२ रोजी भुषणने चार लाख रूपये घेतले आहेत. याही प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाचोरा पोलिस भूषणचा शोध घेत आहेत. दरम्यान त्याने आणखी लोकांना फसवले असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

## भाजप आमदार अतुल भातखळकर यांच्यावर गुन्हा

दै. अधिकारनामा



**मुंबई :** कांदिवलीचे भाजप आमदार अतुल भातखळकर यांच्यावर पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॉंग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्यावर केलेल्या आक्षेपार्ह पोस्टबद्दल पुण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, अतुल भातखळकर यांनी सोनिया गांधी यांच्यावर हे आक्षेपार्ह ट्विट केले होते. या विरोधात पुण्यातील सायबर पोलिस स्टेशनमध्ये कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी तक्रार दिली होती. त्यानुसार आमदार अतुल भातखळकर यांच्यावर पुणे सायबर पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. नॅशनल हेराल्डप्रकरणी कॉंग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची जुलै महिन्यात ईडीने चौकशी केली होती. त्यापूर्वी ईडीने सोनिया गांधींना समन्स पाठवले होते. मात्र, त्याचदरम्यान कोरोना संसर्ग झाल्यामुळे सोनिया गांधींनी चौकशीस हजर राहण्यास असमर्थता दर्शवली होती. त्यावरूनच भातखळकर यांनी सोनिया गांधींवर टीका करत ट्विट केले होते. 'कोरोनाचा ईडी व्हेरीयंट' असे ट्विट भातखळकर यांनी केले होते. या ट्विटवर कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी आक्षेप घेत पुणे सायबर पोलिसांकडे तक्रार दिली होती. अखेर त्यावरून भातखळकर यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे बीबीए, बीएमएस, बीएम.एस-ई कॉमर्स अभ्यासक्रम

दै. अधिकारनामा

**जळगाव :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीमुळे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये लागू करण्यात आलेला प्रथम वर्ष बीबीए, बीएमएस, बीएम.एस-ई कॉमर्स हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता जसाचा तसा लागू राहणार आहे. सोमवारी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीत हा निणऱ्य घेण्यात आला. यासह जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांच्या संदर्भातील प्रस्ताव मंजूर करण्यात आले. या टर्ममधील विद्या परिषदेची ही शेवटची बैठक होती. बैठक कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आठ दिवसांपासून या बैठकी संदर्भातील प्रस्ताव मागवण्यात आले होते. चर्चेअंती प्रस्ताव मंजूर करण्यात आले. विशेष म्हणजे कोरोना काळात ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे निधन झाले आहे, त्यांच्यासाठी ब्रिज कोर्स सुरू करण्याचा निणऱ्य घेण्यात आला. त्यामुळे या पीडित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची भर काढून घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. दरम्यान, सन २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वच विद्याशाखा, व्यावसायिक कोर्सेसच्या अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्यात येणार आहे. परिणामी प्रथम वर्ष बीबीए, बीएमएस, बीएम.एस-ई कॉमर्स हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता जसाचा तसा लागू ठेवावा लागला. पुढच्या वर्षी त्यातही बदल करण्यात येतील. या बैठकीला प्र-कुलगुरू प्रा.डॉ.एस. टी. इंगळे, प्रभारी कुलसचिव किशोर पवार आदी उपस्थित होते.



तापी परिसर विद्यामंडळ संचलित शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय फैजपूर महाविद्यालय बंदबाबत समितीचा सकारात्मक अहवाल सादर. जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट जळगाव संस्थेच्या नावात व आर्टिफिशियल इंटिलिजन्स व डाटा सायन्स या अभ्यासक्रमाच्या नावात बदल होणार. आता जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड बिझनेस मॅनेजमेंट असे नाव आता करण्यात येणार आहे. एआयसीटीई नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या अनुषंगाने जामिया इस्लामिया ईशातूल उलूमचे इन्स्टिट्यूट अक्कलकुवा महाविद्यालयातील बी.ई कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व बी.ई. ई अँड टीसी अभ्यासक्रम बंद. भुसावळ येथील नाहाटा महाविद्यालयात टी. वाय. बी.व्होक केमिकल अँड फार्मा अॅनॅलिटिकल सायन्स अभ्यासक्रमाला सुरुवात करणे. मुक्ताईनगर येथील महाविद्यालयात एस.वाय.बी.व्होक जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन अभ्यासक्रम सुरू.

# मुंबई मेट्रोवरून ठाकरेंवर निशाणा

दै. अधिकारनामा

**मुंबई :** मुंबईतील कुलाबा-सिप्झ या पहिल्या भुयारी मेट्रोची चाचणी आज यशस्वीरित्या पार पडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही चाचणी झाली. यानंतर झालेल्य कार्यक्रमात मेट्रो प्रकल्पावरून उपमुख्यमंत्री फडणवीस व मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरेंना चिमटे काढले. मुबंई मेट्रो प्रकल्पाचे काम आता वेगाने पूर्ण होईल. हा प्रकल्प आता कुणीही थांबवू शकत नाही, असे आव्हानच फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना दिले. तर, या प्रकल्पावरून राजकीय प्रदुषणच जास्त झाले, असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी आदित्य ठाकरेंना लगावला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मेट्रो प्रकल्पावरून राजकीय प्रदुषणच अधिक झाले. त्यामुळे हा प्रकल्प रखडला. मात्र, आता या प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण होईल. कारण आमच्या सरकारला कमी बॉलमध्ये जास्त रन काढायचे आहेत. शिंदे-फडणवीस सरकार स्थापन होऊन आता जेमतेम २ महिने झाले आहेत. तरीदेखील अडीच वर्षांपूर्वी रखडलेले अनेक प्रकल्प आता मार्गी लागत आहेत. याबाबत नरेंद्र मोदी यांनीही राज्य सरकारच्या पाठिमागे पूर्ण शक्तीने उभे राहण्याची ग्वाही दिली आहे. राज्याच्या विकासासाठी वेगाने प्रकल्प राबवण्याच्या सूचना मोदींनी केल्या आहेत. शिंदे म्हणाले, सरकार स्थापन होताच बहुचर्चित अशा मेट्रो प्रकल्पाची स्थगिती आम्ही उठवली. फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यात अनेक प्रकल्प सुरू केले. फडणवीसांच्या ५ वर्षाच्या काळात राज्यात वेगाने प्रकल्प पुढे जात होते. मात्र, अडीच वर्षांत त्यांचे काम रखडले.



मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांनाही जोरदार प्रत्युत्तर दिले. शिंदे म्हणाले, पूर्वी विरोधकांसमोर केवळ देवेंद्र फडणवीस यांचे आव्हान होते. मात्र, आता त्यांच्यासोबत मीदेखील आहे. पहिले केवळ एक होता. आता दोन आहेत. त्यामुळे सरकार चालवताना आम्हही सर्व आव्हानांना सक्षमपणे तोंड देऊ. तसेच, विकासाच्या बाबतीत कधीही राजकारण करणार नाही, अशी ग्वाहीदेखील शिंदेंनी दिली. उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई मेट्रो ३ ची ट्रायल रन यशस्वी झाली आहे. ही मेट्रो आता कुणीही रोखू शकत नाही, असा सिग्नलच या चाचणीने दिला आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी या प्रकल्पातील सर्व अडथळे दूर केले आहेत. यापुढेही काही अडचणी आल्या तर त्या अडचणी दूर करण्याचा त्यांचा मानस आहे.प्रकल्पावरून फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवरही टीका केली. फडणवीस म्हणाले, प्रकल्पाचे नियोजीत वेळेनुसार काम झाले असते तर मेट्रोचा पहिला टप्पा २०२३ मार्चपर्यंत पूर्ण धावू शकला असता. मात्र, मध्ये जे काही वादविवाद झाले, प्रकल्पाला स्थगिती आली. त्यामुळे पहिला टप्पा आता २०२३ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी प्रयत्न केले नसते तर डिसेंबरपर्यंतही हा प्रकल्प धावू शकला नसता. देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रकल्प आणखी लांबला असता तर २० हजार कोटींच्या या प्रकल्पाची किंमत आणखी १५ हजार कोटींनी वाढली असती. त्याचा भार तिकिटांच्या माध्यमातून सामान्य मुंबईकरांवरच आला असता. मेट्रोच्या कार डेपोवरून जो काही वाद झाला तो पर्यावरणापेक्षा राजकीय अधिक आहे.

# संपूर्ण पवार कुटुंबीयांची एकदा चौकशी करा

## गोपीचंद पडळकर यांची पवार कुटुंबावर टीका

दै. अधिकारनामा



**पंढरपूर :** संपूर्ण पवार कुटुंबाच्या रेशनकार्डावर जेवढी नावे आहेत, त्या सर्व व्यक्तींची चौकशी झाली पाहिजे, म्हणजे पवारांचा खरा चेहरा समोर येईल अशा शब्दात भाजपचे विधानपरिषद सदस्य गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. आ.पडळकर हे सोमवारी पंढरपूर दौऱ्यावर आले होते त्यावेळी त्यांनी ही मागणी केली. तर शिवसेना आणि संभाजी ब्रिगेड यांच्या युतीवरही त्यांनी जोरदार टीकरा केली आहे. ज्यांना लोकांमध्ये किंमत नाही त्यांच्यासोबत उद्धव ठाकरेंनी युती केली आहे, अशी टीका भाजपचे नेते गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेनेवर जोरदार टीकास्त्र डागले आहे. आमदार पडळकर म्हणाले की, पवार हे संविधानापेक्षा मोठे नसून आयकर विभाग, ईडी अशा एजन्सीजनी पवारांच्या कुटुंबातील सर्वांची सखोल चौकशी करणे गरजेचे आहे, अशी टीका करतानाच पडळकर यांनी शिवसेनेलाही लक्ष्य केले.

ज्यांना लोकात कोणतीही किंमत नाही, जनाधार नाही अशा लोकांसोबत ते युती करीत राहत असून यावरून शिवसेना किती खोलात गेली आहे हे समोर आले असल्याचा टोला त्यांनी शिवसेना, संभाजी ब्रिगेड युतीसंदर्भात बोलताना सेनेला लगावला. अशा कोणत्याही टेकुने आता शिवसेना सत्तेवर येणार नसल्याचे पडळकर यांनी सांगितले. उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या विचारधारे पासून खूप मोठी फारकत घेतली असून आता त्यांना परत ट्रॅकवर येणे खूप अवघड आहे. ज्या लोकांनी हिंदुत्वाला विरोध केला , ज्या लोकांनी समाजात जातीयवाद पसरविण्याचा प्रयत्न केला अशा लोकांसोबत जाऊन उद्धव ठाकरे समाजाला काय मेसेज देणार आहेत असाही सवाल यावेळी पडळकर यांनी केला.

## मुंबईत तैलिक समाज विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह

दै. अधिकारनामा



**जळगाव :** जिल्ह्यातून मुंबईत उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या तेली समाजातील विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी मुंबईत समाजाचे भव्य वसतिगृह निर्माण करण्यात येईल, अशी माहिती अखिल भारतीय तैलिक सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर यांनी गुणवंतांच्या सत्काराप्रसंगी दिली. लेवा भवनात प्रदेश तेली महासंघातर्फे सोमवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. अध्यक्षस्थानी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष विजय चौधरी हे होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते श्री संताजी जगनाडे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन झाले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुरेश भोळे, महापौर जयश्री महाजन, प्रदेश अध्यक्ष विजय चौधरी, शिरीष चौधरी, संतोष चौधरी, विष्णू भंगाळे, गुलाबराव वाघ, शरद तायडे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसायात गुंतवणूक करून तो वाढवावा. व्यवसायात झोकून दिल्याने आयुष्यात चांगली प्रगती होते. मुलांना मोबाइल द्या. मात्र ते काय बघत आहेत, हे पाहण्याची जबाबदारी पालकांची आहे. आजच्या युगातील पालक हे मुलांना त्यांच्या चांगल्या करिअरसाठी प्रोत्साहन देणारे आहेत. तरुण-तरुणींनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय करून इतरांना नोकरी देणारे व्हावे, असे प्रतिपादन मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

## भुसावळ येथे चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव

दै. अधिकारनामा



**जळगाव :** भुसावळ शहरातील म्युनिसिपल पार्क भागातील श्रीकृष्ण मंदिरात सोमवारपासून चार दिवसीय श्री सर्वज्ञ चक्रधरस्वामी अष्टशताब्दी महोत्सवाला सुरुवात झाली. या महोत्सवात गुरुवारी (दि.१) श्री चक्रधर स्वामींच्या मूर्तीची शोभायात्रा काढण्यात येईल. श्री चक्रधर स्वामी अष्ट शताब्दी महोत्सवात सोमवारी विविध धार्मिक कार्यक्रम झाले. सकाळी पारायण, झेंडावंदन, भजन, देवास मंगलस्नान, तर दुपारी आरती व प्रसाद वितरण झाले. मंगळवारी (दि.३०) सकाळी ९ वाजता सूत्रपाठाचे सामूहिक पारायण, आरती प्रसाद वितरण होईल. बुधवारी (दि.३१) सकाळी ८ वाजेपासून चक्रधर स्वामींच्या लिळांचे चिंतन होईल. या महोत्सवात गुरुवारी (दि.१) चक्रधर स्वामींच्या मूर्तीची दुपारी २ वाजता मिरवणूक काढण्यात येईल. आराध्य प्रतिष्ठानतर्फे या मिरवणुकीचे आयोजन केले आहे. म्युनिसिपल पार्क भागातून सुरुवात होईल. सहभागाचे आवाहन वैशाली आराध्य यांनी केले.

## जमीन हडपल्याच्या वादातून आत्मदहनाचा प्रयत्न

दै. अधिकारनामा

**मुंबई :** राज्याच्या पावसाळी अधिवेशन एका शेतकऱ्याने विधान भवनाच्या प्रवेशद्वाराजवळ पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न केला होता. पाच दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर या शेतकऱ्याचा सोमवारी जे. जे. रुग्णालयात उपचारावेळी मृत्यू झाला. सुभाष देशमुख (वय ५६) असे शेतकऱ्याचे नाव असून त्याने २३ ऑगस्ट रोजी दुपारी मंत्रालयासमोर आत्महत्येचा प्रयत्न केला होता. देशमुख हे ४५ टक्के भाजले होते. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार चालू होते, असे जे. जे. रुग्णालय प्रशासनाने सांगितले. सुभाष देशमुख हे उस्मानाबाद जिल्ह्यातल्या वाशी तालुक्यातील तांदुळवाडी येथील रहिवासी होत. त्यांनी २३ ऑगस्ट रोजी मंत्रालयासमोर अंगावर पेट्रोल ओतून घेत पेटवून घेतले होते. तेव्हा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्यांच्या हातून पेट्रोलची बाटली काढून घेतली होती. दरम्यान, त्यांना उपचारासाठी जीटी रुग्णालयात दाखल केले होते. त्यानंतर जेजे रुग्णालयात हलवण्यात आले होते. गावाकडे जमीन हडपल्याच्या वादातून त्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. रुग्णालयात उपचार सुरू असताना सुभाष देशमुख यांचा मृत्यू झाला. प्लास्टिक सर्जरी विभागाचे डॉक्टर सागर गुंडेवाल यांनी दुपारी बाराच्या सुमारास देशमुख यांच्या मृत्यूबाबत माहिती दिली.

## मध्यप्रदेशच्या सीमेवर भीषण अपघात



दै. अधिकारनामा

**जळगाव :** मध्यप्रदेशच्या हद्दीत जामटी गावाजवळ मंगळवारी पहाटे भीषण अपघात झाला. या अपघातात वैजापूरच्या चोपडा तालुक्यातील ३ तरुण ठार झाले, तर ६ जण जखमी झाले. पंकज प्रकाश बारेला (वय १७) जगदीश केरसिंग बारेला (वय १९), नीलेश शांतीलाल बारेला (२२) अशी मृतांची नावे आहेत. जखमी आणि मृत तरुणांना चोपडा शहरातील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. हे तरुण कबड्डी स्पर्धा बघण्यासाठी मध्यप्रदेशात जात होते. त्याचदरम्यान त्यांच्या वाहनाचा अपघात झाला.

अपघाताबाबत पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशाच्या हद्दीत जामटी येथील वारला तालुक्यात आज पहाटे हा अपघात झाला. वैजापूर येथील ११ तरुण मध्य प्रदेशात कबड्डीच्या स्पर्धा बघण्यासाठी पिक वाहनाने जात होते. मात्र, मध्यप्रदेशच्या सीमेवर त्यांचे वाहन असतानाच अपघात झाला. अपघात नेमका कसा झाला, याबाबत अधिक माहिती मिळू शकली नाही. रस्त्यावरच पिकअप गाडी पलटी झाल्याची माहिती आहे. त्यामुळे घटनास्थळावर ३ तरुण जागीच ठार झालेत. तर ६ जखमी झाले. यातील दोन जण गंभीर जखमी आहेत. जखमींना तातडीने जळगाव जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले होते. जखमींची नावे अद्याप कळू शकली नाही. दरम्यान, अपघातामुळे पिकअप वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला होता. या घटनेमुळे वैजापूरमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.